# नीलेश लंके फकिरच!




# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २०३, बुधवार २४ एप्रिल २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# विखेंची मालमत्ता वाढली, लंकेंची मात्र घटली !

## ■ विखेंची संपत्ती १२ कोटींनी वाढली ■ लंकेंची ३५ लाखांनी घटली

**नगर : प्रतिनिधी लोकसभा निवडणूकीच रणसंग्राम सुरू असताना नगर दक्षिण लोकसभा निवडणूकीमधील प्रतिस्पर्धी उमेदवार खा. डॉ. सुजय विखे व नीलेश लंके यांच्या मालमत्तेमध्ये मात्र कमालीचा फरक दिसून येतो आहे. दोघांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रावरून विखेंची मालमत्ता वाढल्याचे तर नीलेश लंके यांची मालमत्ता घटल्याने नीलेश लंके हे सर्वसामान्यांसाठी स्वतःची पदरमोड करून सेवाभाव करीत असल्याचे कागदोपत्री स्पष्ट झाले आहे.**

नगर : प्रतिनिधी

**नगर लोकसभा मतदारसंघातून सोमवारी (ता. २२) डॉ. सुजय विखे पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. या अर्जासोबत शपथपत्रात दिलेल्या स्थावर आणि जंगम मालमत्तेचा तपशील सविस्तरपणे नमूद करीत सुजय विखे यांनी पत्नी धनश्री विखे आणि दोन मुले यांच्या नावे एकत्रित २९ कोटी १८ लाख ८८ हजार ९९९ रुपये इतकी संपत्ती असल्याचे नमूद केले आहे.**



लोकसभा निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लोकसभा निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली आहे. नगर लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांनी सोमवारी सकाळी तीन स्वतंत्र उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्याकडे दाखल केले. लोकसभा निवडणुकीत उमेदवारी दाखल उमेदवारांना उमेदवारी अर्ज सोबत संपत्ती आणि गुन्ह्यांच्या संदर्भात शपथपत्रावर माहिती देणे बंधनकारक आहे. त्यानुसार उमेदवारी अर्जासोबत सुजय विखे पाटील यांनी विहित नमुन्यात शपथपत्र सादर केले.


या शपथपत्रानुसार डॉ. सुजय विखे यांच्या नावे १२ कोटी १५ लाख ६९ हजार ५८५ रुपयाची स्थावर मालमत्ता आहे. तसेच दहा कोटी ९५ लाख ७० हजार ८९३ रुपयाची जंगम मालमत्ता आहे. सुजय विखे पाटील यांच्या नावे नमूद करण्यात आलेल्या स्थावर आणि जंगम अशा दोन्ही मालमत्तांचे मूल्य २३ कोटी ११ लाख ४० हजार ४७८ इतके नमूद करण्यात आले आहे.

याच शपथपत्रात सुजय विखे यांनी त्यांच्या पत्नी धनश्री सुजय विखे पाटील यांच्या नावे तीन कोटी ८८ लाख ३२ हजार ८२३ रुपयांची जंगम आणि एक कोटी १९ लाख ८९ हजार ४४० रुपयांची स्थावर अशी एकूण ५ कोटी आठ लाख २१ हजार २६३ मालमत्ता असल्याचे नमूद केले आहे.

याच शपथपत्रात सुजय विखे यांनी आपल्यावर अवलंबित असलेल्या दोन मुलांच्या नावे एकूण ९९ लाख २६ हजार २९८ रुपयांची मालमत्ता असल्याचे नमूद केले आहे. तसेच वैयक्तिक स्वतःच्या नावे ३ कोटी ६४ लाख १३ हजार २०९ रुपयाचे कर्ज असल्याचे नमूद केले आहे. या शपथपत्रात विखे यांनी त्यांच्याकडे असलेल्या दागिन्यांची एकूण किंमत ३५ लाख ३३ हजार ५१३ असल्याचे शपथपत्रात विखे यांनी नमूद केले आहे. तर पत्नीकडे असलेल्या दागिन्यांची किंमत ४५ लाख १० हजार १०१ असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

नगर : प्रतिनिधी

**लोकसभा निवडणूकीमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांची सन २०१९ च्या तुलनेत स्थावर आणि जंगम मालमत्ता घटली असून त्यांचे कर्जही वाढले आहे ! राजकीय क्षेत्रातील व्यक्तींच्या मालमत्तेत पाच वर्षांच्या कालवधीमध्ये प्रचंड वाढ होत असताना लंके यांची झोळी मात्र रिकामीच असल्याचे मंगळवारी त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल करताना सादर केलेल्या प्रतिज्ञा पत्रावरून स्पष्ट झाले आहे.**



नीलेश लंके यांनी सन २०१९ मध्ये विधानसभेची निवडणूक लढविली. त्यांनी त्यावेळी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात त्यांची स्थावर मालमत्ता १५ लाख ३५ हजार १५३ रूपये इतकी होती. तर जंगम मालमत्ता ५८ लाख ५६ हजार ५२१ इतकी होती. सन २०१९ मध्ये त्यांच्यावर ३२ लाख २८ हजार ९८९ रूपयांचे कर्ज होते.

लंके यांनी लोकसभा निवडणूकीचा अर्ज मंगळवारी दाखल केला त्यावेळी त्यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात त्यांची स्थावर मालमत्ता सुमारे ४ लाखांनी वाढली आहे. १९ लाख २२ हजार २१० इतकी स्थावर असून जंगम मालमत्तेमध्ये मात्र कमालीची घट झाल्याचे प्रतिज्ञापत्रावरून दिसून येते. सन २०२४ मध्ये लंके यांच्या जंगम मालमत्तेत ३५ लाख २४ हजार २९५ रूपयांची घट झाली आहे. तर लंके यांच्यावरील कर्ज ३७ लाख ४८ हजार ७५७ इतके असून सन २०१९ च्या तुलनेत ते वाढले आहे.

### बँक ठेवी व इतर

हातावरची रोख रक्कम ८१ हजार ४००,राणी नीलेश लंके ४० हजार २००, तेजस नीलेश लंके ५हजार, शिवम नीलेश लंके ६ हजार, स्टेट बँक सुपा शाखा बचत खाते शिल्लक ७ लाख ७६ हजार ८९६ रूपये, राणी लंके बँक ऑफ बडोदा बचत खाते ३१ हजार ८३४ रूपये, तेजस लंके बचत खाते ६ हजार ५६९, शिवम लंके बँक ऑफ बडोदा ४ हजार २७१ रूपये, साई मल्टीस्टेट पतसंस्था वाडेगव्हाण शाखा बचत खाते रूपये १२०.

### कार्यकर्त्याच्या कर्जाला जामीनदार !

साई मल्टिस्टेट पतसंस्थेकडून लंके यांचे कार्यकर्ते ईश्वर ब्राम्हणे यांच्या कर्जप्रकरणात आ. नीलेश लंके हे जामीनदार आहेत. कर्जदार ब्राम्हणे यांनी कर्ज वसुलीप्रकरणी नीलेश लंके यांचा धनादेश दिला होता. हा धनादेश न वटल्याने लंके यांच्यावर भा दं वि १३८ प्रमाणे लंके यांच्यावर गुन्हा दाखल आहे.

### बंधपत्रे, शेअर्स

सेनापती बापट मल्टीस्टेट पतसंस्था शेअर्स १२ हजार ५१० रूपये, नगर अर्बन को ऑप बँक शेअर्स ८ हजार ४००

### शेतकरी आंदोलनाचा एकच गुन्हा

एकीकडे खा. डॉ. सुजय विखे हे नीलेश लंके यांच्यावर गुंडगिरीचा आरोप करीत असले तरी लंके यांच्यावर केवळ एकच गुन्हा दाखल असून सुपा येथे कांद्याचे भाव कोसळल्याने कांदा निर्यात सुरू करण्यासाठी त्यांनी सुपा चौकात केलेल्या आंदोलनाबाबत त्यांच्यावर शेतकरी आंदोलनाचा केवळ एकच गुन्हा दाखल आहे. लंके यांच्या प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता खा. डॉ. विखे यांचा गुंडगिरीचा आरोप खोटा ठरतो.

### कर्ज

३१ मार्च २०२४ अखेर कर्ज ७ लाख १३ हजार ७५७ स्टेट बँक ऑफ इंडिया कार लोन, असुरक्षित कर्ज ३० लाख३५ हजार ,३७ लाख ४८ हजार ७५७ रूपये.

### जंगम मालमत्ता

नीलेश लंके २३ लाख ३२ हजार,२२६, राणी लंके २ लाख ७८ हजार २८४

### जमीनीवर केलेली गुंतवणूक

९०० चौरसफुट सिमेंट पत्रा बांधकाम, जमीनीचे मुल्य ६ लाख ७५ हजार, बांधकामाचे मुल्य १२ लाख ४७ हजार २१०, एकूण १९ लाख २२ हजार २१०

### संपत्तीचे विवरण

हयुंदायी क्रेटा १३ लाख ५ हजार ८००,सोने, जडजवाहीर,चांदी नीलेश लंके १ लाख ४७ हजार १००, राणी लंके २ लाख ६ हजार २५०

### एकूण स्थुलमुल्य

नीलेश लंके : २३ लाख ३२ हजार २२६रूपये, राणी लंके २ लाख ७८ हजार १८४,हंगे येथे गट नं.८३२ नीलेश लंके यांच्या नावे येथे १० गुंठे

# जिल्ह्याच्या विकासासाठी माझा आराखडा तयार

## खा डॉ. सुजय विखे पाटील यांचे प्रतिपादन

पाथर्डी : प्रतिनिधी

**जिल्ह्याच्या विकासासाठी सर्वो तोपरी प्रयत्न करणार, त्यासाठी माझा आरखडा तयार असून त्यात शेतकरी, गरीब- गरजू पासून शहरी भागासाठी विविध योजना आणि नियोजन केले आहे. यामुळे येत्या पाच वर्षात अहिल्यानगरचा विकास हा सर्वासाठी एक उदाहरण राहणार आहे. असे प्रतिपादन महायुतीचे उमेदवार खा.डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले. ते पाथर्डी येथील सभेत बोलत होते. जिल्ह्याचा विकास आराखडा तयार असून देशात पुन्हा मोदींचे सरकार येणार असल्याने जिल्ह्याचा विकास कुणी रोखू शकणार नाही. असेही त्यांनी यावेळी सांगितले.**



पाथर्डी जिरेवाडी येथील प्रचार सभेत बोलताना डॉ. सुजय विखे म्हणाले की, राज्याच्या उत्पनात अहिल्यानगरचा वाटा महत्वाचा आहे. जिल्ह्यात सर्विस सेक्टर बरोबर शेतीला सुद्धा मोठा वाव आहे. कृषी-संलग्न क्षेत्रांमध्ये रोजगाराची उच्च क्षमता जिल्ह्यात असल्याचे त्यांनी सुजय विखे यांनी सांगितले. म्हणुन कृषी-प्रक्रिया, अन्न उत्पादन आणि कृषी-पर्यटन अशा कृषी-संबंधित उद्योगांमध्ये रोजगार निर्मिती आणि स्वयंरोजगारासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्याच बरोबर जिल्ह्याचा भौगोलिक विचार करता पर्यटन क्षेत्रातून सुद्धा मोठ्या प्रमाणात जिल्ह्याचा विकास साधता येणार आहे. यामुळे जिल्ह्यात एमआयडीसीच्या माध्यमातून देशी परदेशी गुंतवणुक आणुन जिल्ह्याची उत्पादन क्षमता कशी वाढली जाईल यावर भर देणार. त्यासाठी रस्ते, वीज, पाणी आणि इतर पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे काम केले जाणार आहे.

शेतकऱ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या जोरावर शेतीला वाव दिला जाणार आहे. त्यासाठी जिल्ह्यात कृषी प्रयोगशाळांची निर्मीती केली जाईल. तर पशु पालन व्यवसायाला चालना दिली जाणार आहे. शेळी- मेंढी पालणातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाच्या विविध योजना जिल्ह्यात उर्वरीत पान ३ वर




# निवडणूक जिंकण्याचा विश्वास नाही तर यश आपलेच!

## ■ आ. नीलेश लंके यांचा विजयाबद्दल आत्मविश्वास ■ लोकसभा निवडणूकीचा अर्ज साधेपणाने दाखल ■ अंध, अपंग, महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती



नगर : प्रतिनिधी

**नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे आपण साधेपणाने अंध, अपंग बांधव तसेच महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आपण आपला उमेदवारी अर्ज दाखल केला असून निवडणूक जिंकण्याचा मला विश्वासच नाही तर यश नीलेश लंके यांनी व्यक्त केला.**

अर्ज दाखल केल्यानंतर निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर दररोज फिरत आहात. विजयाबाबत विश्वास वाटतो का असे पत्रकारांनी विचारले असता लंके म्हणाले, विश्वासच नाही यश आपलेच आहे. धनशक्ती विरूध्द जनशक्ती अशी ही निवडणूक आहे.

लंके म्हणाले, अंध, अपंग तसेच नेते अर्ज दाखल करण्यासाठी उपस्थित होते. आज हनुमान जयंतीच्या मुहूर्तावर अर्ज दाखल करण्यात आला असून हनुमानरायांकडे मी प्रार्थना केली की नगर दक्षिण मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी मला बळ द्या. मतदार संघातील दिन दुबळयांचे आश्रू पुसण्यासाठी मला, सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी मी या निवडणूकीला सामोरे जात असल्याचे लंके यांनी सांगितले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी आवाहन केले की, मंगळवारी हनुमान जयंतीच्या दिवशी नागरीकांनी महाविकास आघाडीच्या रावणारूपी लंकेचे दहन करण्याचा निश्चय करावा. यासबंधी प्रश्न विचारण्यात आला असता लंके म्हणाले, कुठलाही नेता आल्यानंतर व्यासपीठावरून बोलताना त्यांच्या पक्षाची बाजू मांडत असताना टीका केल्यानंतर

Shree Datta Bahuuddeshiya Sanstha's
Saint Vivekanand Public School
A/P-Jamgaon, Tal-Parner, Dist-Ahmednagar
PH-9860815843, 9420812001

REQUIRED TEACHERS
2024-2025

We are looking for passionate experienced /fresher, innovative and qualified teacher with good communication skill and fluency in English for following classes.

| Sr.No. | Subject | Qualification | No.of Post |
|---|---|---|---|
| 1 | Pre-Primary | H.S.C./Graduate/D.Ted | 4 |
| 2 | Primary | H.S.C/Graduate/D.Ted /B.Ed | 3 |
| 3 | Math's | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 4 | Science | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 5 | STT | B.A./M.A.B.ed/(His/Geo) | 1 |
| 6 | English | B.A./M.A.B.Ed | 3 |
| 7 | Marathi | B.A/M.A.B.Ed | 2 |
| 8 | Hindi | B.A/M.A.B.Ed | 1 |
| 9 | Art Teacher (Drawing) | Diploma ATD | 1 |
| 10 | Administrative Staff | Compuer knowledge | 1 |

Walk-in Interview with all document on Thursday 25 April 2024
10.00 AM to 3.PM at Above Address

Note -
• Salary commensurate based on skill, qualification and Experience.
• Training will be provided to Fresher candidate who are



# प्रगतीमंत्र

# नोकरी... संसार...

**घर– संसार सांभाळताना नोकरी की संसार? या दोन गोष्टी महिलांना अनुत्तरित करणाऱ्या ठरतात. कधी कधी या दोन्ही गोष्टींचा मेळ बसतो, पण प्रेग्नन्सी काळात महिलांना बाळाची काळजी घेण्यासाठी घर– संसार आणि नोकरी या दोन गोष्टींपैकी कुठल्यातरी एका गोष्टीलाच प्राधान्य द्यावे लागते. दोन्ही गोष्टी एकदम कराव्या म्हटल्या तर मग त्या स्त्रीसाठी ते अवघड ठरते...**





स्त्रियांच्या जीवनात नोकरीला प्राधान्य देताना घर–संसार ही महत्त्वाची बाजू सांभाळावी लागते. विशेषत: घरात लहान मूल असेल तर त्याकडे लक्ष पुरवताना नोकरदार महिलांची बऱ्याच प्रमाणात फरफट होताना दिसते. प्रेग्नन्सी काळातही महिलांना घरातील काम सांभाळून, नोकरी करताना प्रवासाचा सामना करावा लागतो. या काळात उद्‌भवणाऱ्या आरोग्याच्या तक्रारी, दवाखान्यातील चेकअप, वेळेवर आहार घेणे, वेळेवर औषध घेणे आणि या साऱ्यांतूनच स्वत:बरोबरच गर्भातील बाळाची काळजी घेणे आदी गोष्टींकडे लक्ष द्यावे लागते. अशावेळी मग या स्त्रियांपुढे नोकरी करावी की पूर्णवेळ घरासाठी द्यावा हा प्रश्न पडतो आणि मग बहुतांश स्त्रिया या नोकरीपेक्षा घरालाच प्राधान्य देताना दिसतात.

## नोकरीच्या ठिकाणी कुचंबणा

नोकरदार महिलांसाठी प्रेग्नन्सी लीव्ह मिळत असली तरी बाळ जन्मल्यानंतर ते वर्ष– दीड वर्ष पूर्णपणे स्वत:च्या पायावर उभं राहिपर्यंत त्याची काळजी घेणे हे सर्वस्वी त्या मातेवरच अवलंबून असते. मूल साधारण तीन साडेतीन वर्षांचे होईपर्यंत त्याला समज येते. मात्र त्यापेक्षा लहान मूल घरात सोडून नोकरीसाठी बाहेर पाऊल टाकणे हे त्या स्त्रीसाठी तारेवरची कसरतच असते. काहींच्या बाबतीत घरात बाळाची काळजी घेणारे नातेवाईक असतात. अशा महिलांना नोकरी करताना फारशी अडचण येत नसली तरी ज्यांच्या घरामध्ये बाळाची काळजी घेणारे कुणीच नसेल तर मात्र अशा महिलांना प्रेग्नन्सी लीव्ह घेतल्यानंतरही काही वर्षे मग नोकरी सोडून घरी थांबणे भाग पडते. केवळ अन् केवळ अशावेळी उच्चशिक्षण, नोकरीचा उत्तम अनुभव असूनही या महिलांना नोकरी सोडून घरी थांबावे लागते. आपलं बाळ पाळणाघरात सोपवूनही नोकरी सांभाळणे हे काम त्या महिलांसाठी कठीण वाटते. काही वेळा पाळणाघरात मूल ठेवून महिला नोकरी करण्याचा निर्णय घेतातदेखील; पण त्यांचं अर्ध लक्ष नोकरीत तर अर्ध लक्ष मुलाकडे असल्याने, नोकरीची वेळ सांभाळून लगबग करून घरी जाण्याकडे ओढा राहात असल्याने अशा महिलांची नोकरीच्या ठिकाणीही कुचंबणा होताना दिसते.

## प्रश्न अनुत्तरीत करणारा...

घरातील सगळी कामं उरकणे, बाळाची निगा राखणे, त्याचं खाणं – पिणं, नोकरीची वेळ, जेवण, ऑफिसमध्ये गेल्यावर ऑफिसची कामं वेळेमध्ये पूर्ण करणे या साऱ्यांमध्ये महिला गुरफटून जातात. त्यामुळे कधी घरापायी नोकरीतील कामात दुर्लक्ष तर कधी नोकरीतील कामामुळे घराकडे दुर्लक्ष होणे या गोष्टी साहजिकच घडताना दिसून येतात. यात त्या स्त्रीच्या आरोग्याच्या तक्रारीही वाढतात. स्मार्ट वुमन बनताना नोकरी करताना घराकडे दुर्लक्ष करूनही चालत नाही. मूल सहा महिन्यांचं झालं, मग ते वर्षाचं होऊ दे, मग ते शाळेत जाऊ दे असे करताना मुलामध्ये रममाण होणाऱ्या स्त्रिया आज आपलं करिअरही विसरून गेल्याचेही अनुभवास मिळतात आणि मग त्यानंतर त्यांना नोकरी करावीशी वाटली तरी मग काही ना काही समस्यांमुळे त्या नोकरीसाठी बाहेर पडण्याचे नाकारतात. नोकरी की संसार? हा प्रश्न तसा अनुत्तरित करणारा असला तरी निर्णय हा शेवटी तिचा असतो.

## ती म्हणते...

“

मी एका प्रायव्हेट एजन्सीमध्ये नोकरीला होते. मात्र प्रेग्नन्सी काळात सातव्या महिन्यात आरोग्याच्या तक्रारीमुळे नोकरी सोडणे भाग पडले. मुलीच्या जन्मानंतर जॉब करण्याचा विचार होता, पण त्यावेळी नोकरीपेक्षा तिची काळजी घेणे महत्त्वाचे वाटले. मुलगी दोन वर्षांची झाल्यानंतरही नोकरी करण्याचा विचार केला होता. पण त्यावेळी हे जमले नाही. लहान मुलांना सांभाळून नोकरी करणे कठीण काम आहे. त्यामुळे दोन वर्षे मी गावी सासरी मुलीला घेऊन राहिले. मुलगी चार वर्षांची झाल्यानंतर तिची पाळणाघरात सोय करून मगच नोकरी करण्याचा निर्णय घेतला.

**■ शिल्पा काळे**

मातृत्वाचा अनुभव हा स्त्रीसाठी महत्त्वाचा क्षण असतो. पण या मातृत्वाच्या जबाबदारीतून जाताना घरात राहणाऱ्या व नोकरी करणाऱ्या स्त्रीची तारेवरची कसरत असते. मातृत्वाची जाणीव होताच आनंदाबरोबरच अनेक गोष्टी, प्रश्न समोर येतात. जसे सुरुवातीच्या काळात होत असलेला त्रास, मळमळणे, चक्कर येणे, अशक्तपणा वाढणे अशा या दिवसात तिला कुटुंबाबरोबरच कार्यालयात व प्रवासात चांगल्या सहकार्याची साथ लागते. अन्यथा याचा परिणाम स्त्रीमनाबरोबरच जन्माला येणाऱ्या अर्भकावर होतो. हळूहळू जस जसे दिवस जवळ येतात, तसतसे कार्यालयातून मॅटर्निटीची सुटी मिळेल का? त्यासाठी लागणारी प्रक्रिया, इएसआयसी हॉस्पिटल, ऑफिस यांना भेट देणे, ऑफिसमधील कामे वेळेत करणे, अशा एक ना हजार गोष्टी पार पाडाव्या लागतात, तेव्हा कुठे ती मॅटर्निटी सुटीसाठी जाऊ शकते. मॅटर्निटी नंतरचा महत्त्वाचा प्रश्न येतो तो म्हणजे जॉब करायचा असेल तर बाळाला कुठे ठेवायचे, हे प्रश्न घरच्यांनी सोडवले तर बरेच नाहीतर इच्छा नसतानाही, आईला मनावर दगड ठेवून बाळाला बेबी सिटींगमध्ये ठेवावे लागते. आपल्या काळजाचा तुकडा बेबी सिटींगमध्ये ठेवून जाण्याचा हा निर्णय घेत असताना एका आईला असंख्य वेदना होतात, त्याची जाणीव कुणालाच होऊ शकत नाही.



**■ वर्षा कुलकर्णी**

## महिलांचा टक्का घसरतोय...

आज अनेक क्षेत्रांत महिला आगेकूच करताना दिसत असतानाच प्रत्यक्ष आकडेवारीतून मात्र वेगळाच निष्कर्ष समोर आला आहे. देशाच्या विविध क्षेत्रांतील उद्योगांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये महिलांचे प्रमाण अवघे २५ टक्के इतकेच आहे. धक्कादायक म्हणजे हे प्रमाण सात टक्क्यांनी घटले आहे.

### टक्का कमी का?


- आजही अनेक महिलांना नोकरीसाठी कुटुंबाची परवानगी घ्यावी लागते.
- कामाच्या ठिकाणची सुरक्षा महिलांना नोकरी करण्यापासून परावृत्त करते.
- महिलांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा नसल्याने नोकरीपासून लांब.
- जलद वेगाने मोठ्या होणाऱ्या क्षेत्रांत पुरुषांचे वर्चस्व.
- महिलांना नोकरी करणे अत्यावश्यक वाटत नाही.

### यामुळे घडेल बदल

- महिला उद्योजकांना प्रोत्साहन देणे.
- कामाच्या ठिकाणी महिला सुरक्षेची विशेष खबरदारी घेणे.
- महिलांना नोकरीबाबत मार्गदर्शन करण्यासाठी व्यवस्था उभी करणे.

# वर्किंग वुमनचे प्राधान्य मुलेच!

**नोकरी करणाऱ्या महिलेला प्रवासातच जरा विश्रांती घ्यायला मिळते असे वारंवार समोर आले आहे. घरची चिंता, नोकरीची चिंता, मुलांचा अभ्यास, त्यांच्यासाठी खास वेळ, नोकरीमध्ये आपले कार्यकौशल्य सिद्ध करण्याची चिंता, घरातील सामान संपल्याची चिंता अशा अनेक चिंता डोक्यात सुरू असताना वर्किंग वुमन तिची मुले हेच प्राधान्य असल्याचे अधोरेखित झाले आहे. फॅशनिस्टा मराठी या महिलांविषयक मॅगझिनने केलेल्या सर्वेक्षणातून ही बाब समोर आली आहे.**



मुंबई, पुणे, बंगळुरू, दिल्ली, चेन्नई, हैदराबाद अशा दहा मेट्रो शहरांमधील १८ ते ४० वर्षीय नोकरी करणाऱ्या, इंग्रजी बोलणाऱ्या १ हजार ५४८ आयांशी संवाद साधला. यात काही संयुक्त कुटुंबातील होत्या, तर काही एकल आयाही होत्या. घरच्यांचा पाठिंबा, त्या जिथे काम करतात तेथील पाठिंबा, स्वत:ला मिळणारा वेळ, सहचराकडून मिळणारी मदत अशा अनेक विषयांवर त्यांच्याकडून जाणून घेतले. यातील दोन तृतीयांश महिला पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या होत्या. या महिलांनी मुले हेच प्राधान्य असल्याचे सांगताना निम्म्याहून अधिक महिलांनी दोघांपैकी एकतरी पालक मुलाजवळ असावा अशा पद्धतीने नोकरीची, कामाची आखणी केली जाते, असे स्पष्ट केले. सर्वेक्षणामध्ये सहभागी झालेल्या नोकरदार महिलांनी मुलांसोबत विरंगुळ्याच्या वेळेची आखणीही केली जाते, असे सांगितले. एकच मूल असलेल्या एक चतुर्थांश महिलांनी त्या मुलांसोबत नेहमीच विरंगुळ्यासाठी वेळेची आखणी करतात, असे नमूद केले. मुलांची काळजी घेण्याबाबतच्या सर्वेक्षणात सहभागी महिलांपैकी दोन तृतीयांश महिलांनी सहचर या कार्यात सहभागी असल्याचे स्पष्ट केले. काम आणि घर सांभाळताना घरातील कामांमध्ये सहचराचाही वाटा असल्याचे या सर्वेक्षणात समोर आले आहे. मुलांची काळजी घेताना आर्थिक भार सांभाळण्यासोबतच भावनिक पाठिंब्यासाठीही सहचराची मदत होत असल्याचे दोन तृतीयांश नोकरी करणाऱ्या आयांनी फॅशनिस्टाच्या सर्वेक्षणात सांगितले. यातील अनेक महिलांनी आरोग्य महत्त्वाचे आहे, असेही आवर्जून सांगितले. नोकरी करताना स्वयंपाक करण्यासाठी वेळ मिळत नसल्याचेही त्यांनी सांगितले.

## सर्वेक्षणातील निष्कर्ष

सर्वेक्षणात सहभागी महिलांपैकी ८५ टक्के महिलांनी स्वयंपाकाचे काम त्या करत नसल्याचे स्पष्ट केले. त्यांनी छान दिसणे, ऑनलाइन शॉपिंग, ऑनलाइन मनोरंजन याबद्दलही आपले अनुभव मांडले. महिलांच्या दैनंदिन जीवनाचा वेध घेणारे सर्वेक्षण यानंतरही करण्यात येणार असून, महिलांच्या जीवनाच्या विविध पैलूंना या निमित्ताने समोर आणण्याचा हा प्रयत्न असल्याचे फॅशनिस्टाच्या संचालिका वर्षा मगाडे यांनी स्पष्ट केले. नोकरी करणाऱ्या आयांना घरातून मिळणारा पाठिंबा, नोकरीच्या ठिकाणी मिळणारा पाठिंबा याबद्दल जनजागृतीही गरजेची आहे.

## श्रेय सासू–सासरे अन् पालकांचे...

मुलांना घडवण्यामध्ये सासू–सासरे, पालक यांचाही वाटा अनेक कुटुंबांमध्ये मोठा असतो. नोकरी करून घर सांभाळण्याची कसरत करताना याचे श्रेय नोकरी करणाऱ्या महिलांनी सासू– सासऱ्यांना तसेच पालकांनाही दिले आहे. दोन तृतीयांश महिलांनी यासाठी सासरची मंडळी आणि पालकांवर अवलंबून असल्याचे स्पष्ट केले. तर एकल पालकत्व निभावणाऱ्या निम्म्या महिलांनी आई–वडिलांवर मुलांची काळजी घेण्यासाठी अवलंबून असल्याचे सांगत कृतज्ञता व्यक्त केली.


## नोकरदार महिलांचा टक्का

- इंजिनीअरिंग – ४४.४ टक्के
- तंत्रनिकेतन – २७.७६ टक्के
- एमसीए – ४४.२४ टक्के
- एमबीए – ५२.०४ टक्के
- बीएससी – ६९.४७ टक्के
- बीकॉम – ७०.०२ टक्के
- बीबीए – ५१.७६ टक्के
- बीफार्म – ५१.७६ टक्के



# निकष बदलले!

**नोकरीची निवड करताना किंवा नंतर पुरुष जास्त पगार, बोनसची अपेक्षा करतात आणि महिला सुटी, सोयी– सवलतींचा विचार करतात, असा एक समज दृढ होतो आहे. काही ठिकाणी ही गोष्ट खरी असतेही; परंतु ते चित्र सर्वत्र नाही. वास्तविक सध्या महिला करिअरचा जास्त विचार करताना दिसतात. नोकरी मिळविणे आणि पुढील करिअर याबाबत पुरुष आणि महिला अशा दोघांचेही निकष पूर्वीपेक्षा वेगळेच झाले आहेत...**



देशाच्या स्वातंत्र्यानंतर औद्योगिकीकरणात झालेल्या वाढीमुळे नोकऱ्यांच्या संख्येतही वाढ झाली. सुरुवातीला तुलनेने पुरुषांनाच नोकरीत प्राधान्य देण्यात येत होते. नंतर नागरीकरणाच्या वाढत्या वेगामुळे स्त्रियांनाही नोकरीच्या संधी उपलब्ध होऊ लागल्या. साधारणतः १९५० ते १९९० च्या काळात मिळालेली नोकरी स्वीकारणे, निवृत्त होईपर्यंत आहे तीच नोकरी इमानेइतबारे टिकवून ठेवणे, अशा प्रकारची मानसिकता होती. दर महिन्याच्या १ तारखेला होणारा पगार, दिवाळीत वर्षातून एकदा मिळणारा बोनस, याच गोष्टी खूप आहेत असे मानणारा तो काळ होता. बदली किंवा कामाच्या स्वरूपात करण्यात आलेले बदलही विना तक्रार स्वीकारले जायचे. एखादा पर्याय उपलब्ध असतानाही बांधिलकी आणि आपुलकीचे नाते निर्माण झाल्यामुळे नोकरी मध्येच सोडून देण्याचे प्रकारही नसायचे. १९९० नंतरच्या काळात एकीकडे विभक्त कुटुंब पद्धती वेगाने वाढताना, त्याच वेळी क्रयशक्ती वाढण्याची शक्यता निर्माण होत होती. त्यातूनच नोकरी निवडताना पगाराबरोबर कँटिन, ट्रान्सपोर्ट, विमा, आरोग्य सुविधा, पगारी सुट्या अन्य सोयी सुविधा इत्यादींबाबत पुरुष आणि स्त्री उमेदवार दोघेही आग्रही होऊ लागले. विशेषतः नवीन नोकरी स्वीकारताना, जुन्या नोकरीतील पगारापेक्षा २० ते २५ टक्के पगारवाढीची मागणी पुरुष उमेदवारांकडून, तर स्त्री उमेदवारांकडून ३० ते ४० टक्के पगारवाढीची अपेक्षा करण्यात येत आल्याचे दिसून येते.

## पुरुषांपेक्षा महिलांच्या अपेक्षा वाढल्या...

सुरुवातीच्या काळात केवळ सरकारी नोकऱ्या किंवा बँक, शिक्षण संस्था, उत्पादन क्षेत्र असे मर्यादित प्रकारच उपलब्ध होते. नंतर नवनवीन प्रकारच्या नोकऱ्या निर्माण झाल्या. म्हणजेच केपीओ, बीपीओ, हॉस्पिटॅलिटी, आरोग्य, रिटेल, मनोरंजन क्षेत्र व सर्वाधिक विस्तार असलेले सेवा क्षेत्र झपाट्याने वाढू लागले. या क्षेत्रातील नोकरी करणाऱ्या स्त्री व पुरुष उमेदवारांना पगाराव्यतिरिक्त इन्सेन्टीव्हचीही गरज महत्त्वाची वाटू लागली. नोकरीत केलेल्या उत्तम कामामुळे कंपनीला फायदा होत असेल, तर इन्सेन्टीव्ह, पगारवाढ अशा स्वरूपात कामगारांना फायदा व्हायला हवा, ही भूमिका वाढू लागली. नोकरी स्वीकारताना इन्सेन्टीव्ह, परदेशातील संधी, पगारवाढ कधी होते, किती प्रमाणात होते, किती कालावधीनंतर होते, त्याचे निकष काय असतात, अशा गोष्टींची चौकशी आणि त्याचा विचार करून नोकरी स्वीकारायची की नाही, असा विचार पुरुषांच्या तुलनेने महिला जास्त प्रमाणात करताना दिसतात. सध्या पुरुषांच्या तुलनेने महिला करिअरचा जास्त विचार करतात. नोकरीची निवड करताना पगार, सोयी–सुविधा यांच्याबरोबरच करिअरबद्दल जास्त आग्रही आहेत. नोकरी स्वीकारल्यानंतर पुढील करिअरची दिशा कशी असेल, हा विचार महत्त्वाचा ठरतो आहे. याशिवाय नोकरी करत असलेल्या कंपनीची किंवा संस्थेची वृद्धी, भावी काळातील विस्तार योजना, धोरणे इत्यादी गोष्टी निकष म्हणून विचारात घेतल्या जात आहेत.




## आस्था झाली कमी

*जागतिकीकरण व मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केल्यानंतरच्या काळातील, विशेषतः आय.टी. व रिटेल कंपन्यांमुळे मोठ्या प्रमाणात व्हाइट कॉलर नोकऱ्या अस्तित्वात आल्या. त्यात पुरुषांच्या तुलनेने महिलांना मोठ्या प्रमाणात नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या. या नोकऱ्या स्वीकारताना पाच दिवसांचा आठवडा असेल तर बरे, कामाचे ठिकाण घराजवळ असायला हवे, महिलांसाठी तर बाळंतपण रजा, पाळणाघर सुविधा अशा गोष्टींचीही विचारणा होऊ लागली. शिक्षण, अनुभवाचा विचार करता करिअरच्या दृष्टीने मिळणारे कामाचे स्वरूप, पद, भत्ते यांचे प्रमाण काय असेल, या बाबींचा प्रामुख्याने विचार होऊ लागला. त्यातूनच पुढे सातत्याने थोडीफार तरी पगारवाढ असल्याचे दिसताच, हातातील नोकरी सोडून प्रोफाइल अपग्रेडेशनच्या बिरुदाखाली नवीन नोकरी स्वीकारण्याचे प्रमाणही वाढल्याचे दिसून येते. नोकरीतील अशा सातत्याने होणाऱ्या बदलातून कामाप्रती व कंपनीप्रतीची आस्था कमी झाल्याचे दिसते.*

## शॉर्ट न्यूज

### गुप्तीने दहशत करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**सोनई :** येथे भरदुपारी विनापरवाना हातामध्ये गुप्ती घेऊन आरडाओरड करत दहशत निर्माण केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सोनईत हॉटेल जवळ मयूर चंदन नलावडे व सार्थक चंदन नलावडे, दोघेही रा. धनगरवाडी, ता. नेवासा हे हातामध्ये विनापरवाना बेकायदा गुप्ती घेऊन आरडाओरड करून दहशत निर्माण करताना आढळून आले. त्यामुळे सार्वजनिक शांततेचा भंग केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा भारतीय शस्त्र अधिनियम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी पोलीस नाईक बाचकर हे तपास करीत आहेत.

### दुचाकीवरील तरुणाने गंठण ओरबाडले

**श्रीरामपूर :** संगमनेर रोडवर एस. टी. कार्यशाळेजवळ एका महिलेचे गंठण धूम स्टाईलने चोरल्याची घटना घडली. या गंठणाची किंमत सुमारे ५० हजार रुपये आहे. रूपाली सुधीर कदम (रा. आगाशेनगर) आणि त्यांचे पती सुधीर व मुलगा असे तिघे जण दुचाकीवरून जात असताना त्यांच्यामागे भरधाव वेगात दोघे जण मोटारसायकलवरून आलेल्यांनी रूपाली यांच्या गळ्यातील मिनी गंठण हात घालून ओरबाडले व ते फरार झाले. रूपाली यांनी आरडाओरड केली. मात्र, चोरटे फरार होण्यात यशस्वी झाले. अज्ञात गंठण चोराविरुद्ध शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### साई सेवा मतिमंद विद्यालयात पालक सभा संपन्न

**शिर्डी :** साई सेवा निवासी मतिमंद मुला मुलींची शाळा शिर्डी येथे पालक सभा आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमाची प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा सामान्य रुग्णालय अहमदनगर येथील नवजात शिशु व बालरोग तज्ञ डॉ. उज्वला शिरसाठ व पालक प्रतिनिधी लोणावळा येथील पोलीस इन्स्पेक्टर आसाराम शेटे होते. डॉ. उज्वला शिरसाठ मॅडम यांनी पालकांना विद्यार्थ्यांच्या आहाराविषयी व विद्यार्थ्यांच्या आरोग्य विषयी विशेष माहिती सांगितली. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुनंदा घुले यांनी आलेल्या सर्व पाहुण्यांचे व पालकांचे आभार मानले.

### बसस्थानकातून महिलेच्या दागिन्यांची चोरी

**संगमनेर :** येथील बसस्थानकातून महिलेचे दीड तोळे वजनाचे गंठण अज्ञात चोरट्याने लांबवल्याची घटना घडली. याप्रकरणी संगमनेर शहर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. सुरेखा नारायण कस्तुरे (वय ६५, घारपुरी घाट, आधार आश्रमासमोर, अशोक स्तंभ नाशिक) या संगमनेर बसस्थानकात होत्या. त्यावेळी अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेत गंठण चोरून पोबारा केला. याप्रकरणी कस्तुरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून शहर पोलिसांत अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

### विजेच्या धक्क्याने तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

**अकोले :** तालुक्यातील रेडे येथील किरण पांडे (वय २०) या तरुणाचा विजेचा धक्का लागल्याने दुर्दैवी मृत्यू झाला आहे. मयत किरण हा एका कंपनीत डिलेवरी बॉय म्हणून काम करत होता. अत्यंत कष्टाळू मुलगा गमावल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्याची आई मोलमजुरी करून उपजीविका करायची, किरण त्यास हातभार लावत होता. मात्र अचानक दुपारच्या वेळी कामावरून परत आल्यानंतर प्रचंड उष्णतेमुळे किरणने अंघोळ केल्यानंतर टॉवेल वाळायला टाकत असताना तारेला वीज प्रवाह उतरला असल्याने किरणला जोराचा धक्का लागल्याने तो जागेवरच कोसळला.

# कर्जत केसरीचा किताब रोहित मोढळेने पटकावला

## अनेक मल्लांच्या लक्षवेधी कुस्त्या




**कर्जत : प्रतिनिधी**

**भास्करदादा तोरडमल आणि दिलीपनाना तोरडमल यांच्या पुण्यतिथीनिम्मित आयोजित कुस्ती मैदानात कर्जत केसरीचा रोहित मोढळे मानकरी ठरला. तर रामकृष्ण पोटरे याने राजमुद्रा केसरीचा किताब पटकावला. राजमुद्रा ग्रुपचे अध्यक्ष विजयकुमार तोरडमल यांनी या प्रेक्षणीय कुस्त्यांचे आयोजन केले होते.**

सदर कुस्ती मैदानाचे उद्घाटन सर्व सामाजिक संघटनेच्या श्रमप्रेमीच्या हस्ते करण्यात आले. कर्जत येथील कै भास्करदादा तोरडमल आणि दिलीपनाना तोरडमल क्रीडा संकुलाच्या आवारात महाराष्ट्रासह हरियाणा राज्यातील नामवंत मल्लांनी या कुस्ती मैदानासाठी हजेरी लावत हजारो प्रेक्षकांच्या उपस्थित प्रेक्षणीय आणि काळजाचा ठोका चुकविणाऱ्या कुस्त्या पार पाडल्या. विशेष म्हणजे यामध्ये १० ते १२ महाराष्ट्र चॅम्पियन तर २ उपमहाराष्ट्र केसरी मैदानात उतरले होते. कर्जत केसरी या मानाच्या किताबासाठी रोहित मोढळे आणि धुलाजी इरकर यांच्यामध्ये कुस्ती रंगली असता मोढळेने इरकर यास अस्मान दाखवत कर्जत केसरीचा किताब, चांदीची गदा आणि ५१ हजार रुपयांची रक्कम पटकावली. तर राजमुद्रा केसरीसाठी रामकृष्ण पोटरे याने दिल्लीच्या राकेशकुमार वर डाव टाकून विजय मिळवत राजमुद्रा केसरी किताबाचा मानकरी ठरला.

यासह तुफानी लढतीत उपमहाराष्ट्र केसरी शैलेश शेळके विरुद्ध प्रकाश बनकर कुस्तीत शेळकेने हप्ते डावावर बनकर वर विजय मिळवला. मनोरंजन कुस्तीमध्ये नेपाळ देशातील देवा थापा याने हरियाणाच्या सुमितकुमार वर विजय मिळवून मनोरंजन कुस्ती जिंकली. तसेच दिलीप नाना गुलाबराव तोरडमल संकुलातील अनेक मल्लांनी लक्षवेधी कुस्त्या करून बक्षिसे पटकावली. या कुस्ती मैदानासाठी जिल्ह्यासह राज्यातील कुस्ती शौकिनांनी हजेरी लावत मल्लांचे मनोबल वाढवले. त्यांच्या बैठकीसाठी आयोजक विजयकुमार तोरडमल यांनी भव्य प्रेक्षक गॅलरीची व्यवस्था केली होती. मैदान यशस्वीतेसाठी कुस्ती संकुलाचे वस्ताद ईश्वर तोरडमल, धरम परदेशी, वैभव सुपेकर, किरण नरवडे, सचिन जाधव, अप्पू लाळगे, अशोक तोरडमल, बच्चन मांडगे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# पाणी वाद सोडवण्यासाठी सिंचनाचे प्रकल्प पूर्ण करणार

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सूतोवाच

**शिर्डी : प्रतिनिधी**



**नगर, नाशिक विरुद्ध मराठवाडा असा पाण्यावरून निर्माण झालेला प्रादेशिक वाद कायमचा सोडवण्यासाठी उत्तर महाराष्ट्रातील अपूर्ण सिंचनाचे प्रकल्प पूर्ण करण्याबरोबरच घाट माथ्यावरील समुद्राला वाहून जाणारे अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळवण्यासाठी आगामी काळात ठोस भूमिका घेतली जाणार असल्याचे सूतोवाच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**

राहाता येथील महायुतीचे उमेदवार सदाशिव लोखंडे यांच्या प्रचारसभेत ते बोलत होते. तत्पूर्वी महसूलमंत्री राधाकृष्ण विखे म्हणाले, स्व. बाळासाहेब विखे आणि गणपतराव देशमुख यांनी घाटमाथ्यावरील पाणी अडवून दुष्काळी गोदावरी खोऱ्यात आणण्याबाबतचा प्रस्ताव फडणवीस मुख्यमंत्री असताना दिला होता. त्याला फडणवीसांनी ५० हजार कोटींसह मान्यता दिली होती. मात्र २०१९ च्या निवडणुकीनंतर विश्वासघाताने सत्तेवर आलेल्या उद्धव ठाकरे सरकारमुळे राज्य विकासापासून ५० वर्षे मागे गेले. तसेच पाणी वळवण्याचा प्रस्तावही मागे पडला. आता मुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी लक्ष घालून गोदावरी खोऱ्यातील पाण्याची तूट भरून काढण्यासाठी प्रयत्न करावा.

विखेंच्या मागणीचा धागा पकडत फडणवीस म्हणाले, आम्ही नगर जिल्ह्यातील निळवंडेचा प्रश्न निकाली काढला. मोदींच्या हस्ते जिरायत भागात पाणी दिले. मोदी आणि शिंदेंच्या नेतृत्वाखाली नगर, नाशिक विरुद्ध मराठवाडा हा पाण्याच्या प्रश्नावरून सुरू असलेला प्रादेशिक वाद संपुष्टात आणण्यासाठी उत्तर महाराष्ट्रातील अपूर्ण सिंचनाचे प्रकल्प आगामी काळात पूर्ण करणार आहोत.

**संविधानाची विरोधकांनी काळजी करू नये**

गेली साठ वर्षे काँग्रेस सत्तेत असताना कधीही संविधान दिन देशात साजरा झाला नाही. मोदींनी पंतप्रधान झाल्यानंतर देशभर संविधान दिन साजरा केला. मात्र आयुष्यभर डॉ. आंबेडकरांना निवडणुकीत त्रास देणाऱ्या काँग्रेस, मविआचे नेते संविधानाबद्दल मोदींवर चुकीचा आरोप करत आहेत. हा चोराच्या उलट्या बोंबा असाच प्रकार आहे, असे फडणवीस म्हणाले.

(पान १ वरून)

### जिल्ह्याच्या विकासासाठी माझा आराखडा तयार

राबविल्या जातील. त्याचबरोबर जिल्ह्यात बांधकाम व्यवसाय जोर धरत आहे. त्यातून सामान्यांना परवडणाऱ्या घरांच्या योजना केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून राबविल्या जातील. तसेच ट्रेडींग,रिपेरिंग, हॉटेल, अशा व्यवसायांना अनुकुल वातारण निर्माण केले जाईल. असे डॉ. सुजय विखे यांनी सांगितले.

यामुळे माझे विकासाचे व्हिजन क्लिअर असून केंद्रात पुन्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सत्ता येणार असल्याने आपल्या जिल्ह्याचा कुणीच विकास रोखू शकणार नाही. यामुळे देशाच्या विकासाबरोबर जिल्ह्याच्या विकासासाठी आपण मला मतदान करा असे आवाहन त्यांनी मतदारांना केले.

यावेळी सभेला आमदार मोनिका राजळे, राहुल राजळे, माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड, संजय बडे, तालुका अध्यक्ष मृत्यंजय गर्जे, बाळासाहेब गोल्हार, अजय रक्ताटे, प्रतिक खेडकर, माणिकराव बटोळे आदी मान्यवर उपस्थित होते.

### निवडणूक जिंकण्याचा विश्वास नाही तर यश आपलेच!

वाजवितात. अशा गोष्टींना उत्तर द्यावेच असे काही नसते. ते कोणत्या भावनेने बोलले हे मला माहीती नसल्याचे लंके यांनी सांगितले.

हनुमान भक्तालाच गदा मिळणार !

हनुमान जयंतीचे औचित्य साधून चाहत्यांनी दोन गदा भेट दिल्याच्या पार्श्वभुमीवर बोलताना लंके म्हणाले, मी हनुमान भक्त आहे, हनुमान भक्तालाच गदा मिळणार. मला गदा मिळणार नाही मग कोणाला मिळणार ? ही सर्वसामान्य जनतेची गदा आहे. हनुमानरायांची गदा पैलवानाला दिली जाते अशी पुष्टीही लंके यांनी यावेळी बोलताना दिली. प्रत्येकाच्या घराघरात, मनामनात आपल्या पक्षाचे चिन्ह पोहचविण्यावर भर देण्यात येत आहे. ही निवडणूक जनतेनेच हाती घेतली असल्याने निवडणूकीची दुसरी रणनिती काही नाही नसल्याचे लंके यांनी स्पष्ट केले.

**हनुमानाचे दर्शन घेऊन लंके नगरकडे मार्गस्थ**

मंगळवारी सकाळी नीलेश लंके यांच्या निवासस्थानी त्यांच्या कुटूंबियांसह सुवासिनींनी लंके यांचे औक्षण केल्यानंतर ते अर्ज दाखल करण्यासाठी नगरच्या दिशेने निघाले. नेहमीच्या सवयीप्रमाणे हंगे गावातील हनुमान मंदिरात जाऊन दर्शन घेतल्यानंतर लंके हे नगरकडे मार्गस्थ झाले.

**सर्वसामान्यांचा पाठींबा नीलेश यांना**

सर्वसामान्य जनतेच्या आग्रहाखातर नीलेश लंके हे लोकसभा निवडणूकीच्या रिंगणात उतरले आहेत. सर्वसामान्य जनतेचा पाठींबा नीलेश यांच्या पाठीशी आहे.
ज्ञानदेव लंके
नीलेश लंके यांचे वडील

**विश्रांती मिळत नाही याचे दुःख**

निवडणूकीच्या प्रचाराच्या धामधूमीत पहाटे दोन,तीन ला तर कधी पाच वाजताही घरी येतात. पुन्हा सकाळीच सात वाजता पुढच्या प्रवासाची तयारी असते. तासभरही झोप घेत नसल्याने मनाला वाईट वाटते. कोरोना संकटात कोरोना बाधितांची सेवा करताना नीलेश हे घराकडे आलेच नाहीत.
शकुंतला लंके
नीलेश लंके यांच्या आई

**म्हणून साधेपणाने अर्ज दाखल**

सध्या उष्णता फार आहे. कार्यकर्त्यांना अर्ज दाखल करण्यासाठी उन्हामध्ये येण्याचा त्रास देणे हे मला योग्य वाटले नाही. त्यामुळे साधेपणानेच अर्ज दाखल करण्याचा निर्णय घेतला असल्याचे लंके म्हणाले.

**उत्तरेचे पार्सल उत्तरेला जाणारच !**

नगर दक्षिण मतदारसंघासाठी आजचा आनंदाचा दिवस आहे. धनशक्ती विरूध्द जनशक्ती अशी ही लढत होणार आहे. या लढाईत जनशक्तीचा नक्कीच विजय होणार आहे. उत्तरेचे पार्सल उत्तरेला जाणारच आहे.
अक्षदा दीपक लंके
नीलेश लंके यांची पुतणी

हजारो कार्यकर्त्यांची हजेरी

लंके यांनी आपण अंध, अपंग बांधव तसेच महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत अर्ज दाखल करणार असल्याचे जाहिर केले होते. तरीही जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर महाविकास आघाडीच्या हजारो कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. लंके हे अर्ज दाखल करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात गेल्यानंतर कार्यकर्ते लंके यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी करत होते.











# वाळवणे येथील भैरवनाथ यात्रा उत्सवास बुधवारपासून प्रारंभ

## छबिना, काठी मिरवणूक आणि कुस्त्यांचा हगामा



**सुपा : प्रतिनिधी**

**चैत्र वैद्य प्रतिपदेला पारनेर तालुक्यासह राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या वाळवणे येथील श्री भैरवनाथांच्या यात्रा उत्सवाला सुरुवात होते. यावर्षी बुधवार दि.२४ रोजी यात्रा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.**

यात्रेच्या पाच दिवस आधी नाथांच्या मूर्तीला तेल लावले जाते. या पाच दिवसाच्या दरम्यान ग्रामस्थ उपवास करतात. गावात या पाच दिवसात मांसाहार केला जात नाही. उत्सवाच्या दिवशी सकाळी महाआरती होते व उत्सवात सुरुवात होते दिवसभर मानाच्या काठ्या तसेच वेगवेगळ्या समाजाचे मान असतात. रात्री बारा वाजता श्रींचा छबिना काढला जातो. मंदिराच्या सभा मंडपाजवळ छबीना आल्यावर येथे असलेल्या दगडाची गोटी बोटाने उचलण्याची प्रथा आहे. दगडी गोटीच्या बाजूने अकरा लोक बसतात आणि हाताच्या मधल्या बोटाने श्रीनाथांच्या जयघोषात ही दगडी गोटी उचलतात. श्रींचा छबिना नंतर ग्रामप्रदक्षिणेसाठी प्रस्थान करतो.रात्रभर नाथांच्या पालखीसमोर ढोल लेझीम खेळत भक्त गण आपला आनंद व्यक्त करतात.

काही भक्त कायगाव येथील प्रवरा संगमावरून देवाच्या अभिषेकासाठी पायी प्रवास करून पाणी घेऊन येतात. सकाळी याच पाण्याने श्रींना अभिषेक झाला की मग उत्सवाची सुरुवात होते. यात्रा काळात साधारण दोन ते तीन लाख भाविक नाथांच्या दर्शनासाठी येतात. दुसऱ्या दिवशी कुस्त्यांचा जंगी आखाडा भरतो. आखाड्यात महाराष्ट्रातील राज्यभरातील मल्ल भाग घेतात. या उत्सवाप्रमाणे श्री कालभैरवनाथांचा जन्मोत्सव देखील तितक्याच दिमाखात थाटामाटात साजरा केला जातो.

नाथांचा जन्मोत्सव हा सात दिवस केला जातो. या काळात अखंड हरिनाम सप्ताह देखील आयोजित केला जातो. सप्ताह काळात सात दिवस महाप्रसाद देखील असतो नाथांच्या जन्मदिनी कार्तिकी व अष्टमी रात्री बारा वाजता पुजारी पाळणा गातात व प्रसाद वाटला जातो. पाळण्यावर भाविकांकडून पुष्ट वृष्टी केली जाते या प्रमुख दोन उत्सवा व्यक्तिरिक्त नवरात्र उत्सव आणि दसरा उत्सव देखील साजरे केले जातात. अश्विन शुद्ध दशमीला नाथांची पालखी सिमोनलंगन दिली जाते.

वर्षभर विविध धार्मिक आणि सामाजिक उपक्रम श्री भैरवनाथ देवस्थान ट्रस्टच्या वतीने राबवली जातात. अशा या ऐतिहासिक वारसा लाभलेल्या मंदिराचे आणि श्री कालभैरवनाथांचे भाविक मोठ्या श्रद्धेने दर्शन घेतात. हिरवी गर्द झाडी, नितळ आकाश आणि डोंगर रांगा निसर्गाच्या कुशीत वसलेलं वाळवणे हे गाव नगर पुणे महामार्गावरील सुपा शहरापासून जवळ असलेले हे गाव आपल्या निसर्गरम्य वातावरणामुळे सर्वांचे लक्ष वेधून घेते. निसर्ग संपन्न अशा या गावाला तितकाच मोठा इतिहास लाभलेला आहे. बऱ्याच वर्षांपूर्वी गणेशवाडी म्हणून प्रचलित असलेले हे गाव प्रसिद्ध आहे. ते येथील ऐतिहासिक कालभैरवनाथांच्या मंदिरासाठी होते.

भैरवनाथ देवाधिदेव महादेवाचे अवतार क्षेत्रपाल नावाने प्रचलित असलेल्या या भैरवनाथांचे एक वेगळी कहाणी आहे. एका प्राचीन आख्यायीकेनुसार वाळवणे कामरगाव शिवेवर देव प्रगट झाले असे म्हटले जाते.आजही त्या ठिकाणी पाण्याचा जिवंत झरा आपल्याला पहावयास मिळतो. या ठिकाणी एक लहान मुलगी गुरे चालण्यासाठी घेऊन गेली असताना देव त्या छोट्या मुलीला प्रसन्न झाले. तिला गावातून त्यांचे दर्शन घ्यायला इथपर्यंत येण्यास त्रास होऊ नये म्हणून देवाने तिच्याबरोबर गावात येण्याचे ठरवले. गावाच्या उत्तरेला काही अंतर पुढे गेल्यावर देवांच्या रथाचा सारथी खाली वाकला. त्याच ठिकाणी आजही देवाची एक छोटे ठाणे मंदिर आहे. पुढे बिरोबाच्या माळावर आल्यावर देवांच्या रथाचे चाक तुटल्याने निखळून पडले. इथेच आणखी एक ठाणे मंदिर व रथाची चाक आपल्याला पहावयास मिळते. गावाच्या जवळ पोहोचतात गावकऱ्यांनी या मुली बरोबर स्वयं देवाला येताना पाहताच गावकऱ्यांनी एकच जल्लोष करत देवाची मिरवणूक काढून देवांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून मंदिर बांधले अशाप्रकारे गावकऱ्यांकडून श्री क्षेत्रपाल काळभैरव नाथांचे मंदिर अस्तित्वात आले.

काळभैरवनाथांच्या कृपेने गावकऱ्यांना या तीर्थक्षेत्राची प्रचिती येऊ लागली आणि बघता बघता पंचक्रोशीमधील गावांमधून भाविक श्रींच्या दर्शनासाठी येऊ लागला. नवसाला पावणाऱ्या या श्री काल भैरवनाथांच्या मंदिराच्या कळसाचे काम गावकऱ्यांकडून १९७१ साली सुरू करण्यात आले. ग्रामस्थांनी श्रमदानातून या मंदिराचे काम केले महाराष्ट्रातूनच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरील भाविक देखील यात्रेदरम्यान दर्शनाचा लाभ घेतात.

### यात्रेतील मुख्य आकर्षण

**यावर्षी देवस्थान ट्रस्टच्या वतीने नाथांच्या छबिण्यासाठी विशेष आकर्षण म्हणून अघोरी पद्धत व डमरू पथकास उज्जैन महाकाल वरून पाचारण करण्यात आले आहे.**

**नितीन पठारे**
अध्यक्ष भैरवनाथ देवस्थान ट्रस्ट वाळवणे.

### यात्रेदरम्यान येणाऱ्या भाविकांसाठी सुविधा

**यावर्षी सुमारे पाच लाख भाविक भैरवनाथांच्या दर्शनाचा लाभ घेतील असा अंदाज आहे. त्यानुसार येणाऱ्या भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वाहन पार्किंग, दर्शन रांगा, यात्रेदरम्यान गर्दी किंवा वाहतुकीचा खोळंबा होऊ नये यासाठी बायपास सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. पारनेर महामंडळाच्या वतीने वाढीव बसेसचीही व्यवस्था करण्यात आली आहे.**

**संगीता गोरक्षनाथ दरेकर**
सरपंच वाळवणे.

# मळगंगा देवीला हळदीचा कार्यक्रम उत्साहात संपन्न

## महिला भगिनींनी केला देवीचा जयजयकार

**निघोज : प्रतिनिधी**

**राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या पारनेर तालुक्यातील निघोज येथील मळगंगा देवीला हळद लावण्याचा कार्यक्रम सोमवारी दि २२ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. दुपारी पाच वाजता हळदीची मिरवणूक शेकडो सुवासिनींच्या उपस्थितीत वाजत गाजत सुरु झाली.**



■ राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीला हळद लावण्याचा कार्यक्रम सोमवार दि.२२ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. (छाया : जयसिंग हरेल, निघोज)

मळगंगा मंदिर ते ग्रामपंचायत चौक तसेच मळगंगा देवीची हेमांडपंथी बारव ते पुन्हा मळगंगा मंदिरात मिरवणूक आल्यानंतर शेकडो सुवासिनींने मळगंगा देवीचे औक्षण केले व विधीपूर्वक मळगंगा देवीला हळद लावण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर मळगंगा देवीच्या हेमाडपंथी बारवेत देवीच्या मुर्तीची पुजा करीत हळद लावण्यात आली. यावेळी महिला भगिनीनी देवीच्या जयजयकार करीत तसेच देवीची गाणी गात देवीची आराधना केली.

मंगळवार दि.२३ रोजी दुपारी ८५ फूट उंचीची काठी मिरवणूक संपन्न होणार असून संपूर्ण गावात काठी मिरवणूक काढीत मळगंगा मंदिरापाशी ही काठी स्थानापन्न करण्यात येते. दि. १ मे रोजी देवीचा मुख्य यात्रा उत्सव सुरू होत असून देवीला अंबील वर्तवीणे, बगाडगाडा मिरवणूक, रात्री छबिणा मिरवणूक, मध्यरात्री हेमाडपंथी बारवेत देवीच्या घागरीचे दर्शन दि.२ मे रोजी घागर मिरवणूक, दुपारी पालखी मिरवणूक कुंडावरील यात्रा दि.३ मे रोजी दुपारी पाच वाजता कुस्ती हगामा अशाप्रकारे कार्यक्रम आयोजन असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट, निघोज ग्रुप ग्रामपंचायत व ग्रामस्थ तसेच मुंबईकर मंडळ यांनी केले आहे.

### यात्रेसाठी लाखो भाविक येणार

**मळगंगा देवीच्या यात्रेसाठी मोठ्या संख्येने भाविक येत असतात साधारण दहा ते अकरा दिवसांत पाच ते सहा लाख भाविक दर्शनासाठी येत असतात. मळगंगा देवी जागृत देवस्थान असून भाविकांच्या नवसाला पावणारी देवी म्हणून राज्यात देवीचा नावलौकिक असल्याने संपूर्ण राज्यातील भाविक मोठ्या संख्येने येत असतात. शेकडो वर्षांपासून येथील गायखे कुटुंबाला देवीचे पुजारी म्हणून मान मिळालेला असून पहाटे तीन ते पाच विधीवत पूजा करुण गायखे कुटुंब शेकडो वर्षांपासून देवीची सेवा करीत आहेत. गोंधळी समाजातील दुणगुले कुटुंब संबळ आरती करीत असून दररोज आरतीसाठी शेकडो भाविक गर्दी करीत असतात.**

# देवीभोयरे येथे भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव साजरा

## शोभायात्रा,भक्तिगीत गायन आणि प्रश्नमंजूषा कार्यक्रम

**देवीभोयरे : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील देवीभोयरे येथे रविवारी पारनेर तालुकास्तरीय ६२३ वा भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव साजरा करण्यात आला.सकाळी शोभायात्रा काढण्यात आली होती. नंतर चौकात विविध भक्तिगीत गायन व नृत्य तथा प्रश्नमंजुषा असे कार्यक्रम सादर झाले.**



कीर्ती युवा जैन मंडळ, अहमदनगर या महिला कलाकारांनी भक्तिगीत गायन आणि भक्ति नृत्याचे कार्यक्रम सादर केले. प.पू. डॉ. मधुबालाजी आणि दीक्षिताश्रीजी या महासतींची व्याख्याने झाली. त्यांनी आपल्या व्याख्यानांतून महावीरांच्या अहिंसा परमो धर्म, जगा आणि जगू द्या या उच्च तत्त्वांचे पालन आपण सर्वांनी केले पाहिजे, जैन धर्मीय बालकांसाठी संस्कार वर्ग भरविले जावेत, असे प्रतिपादन केले. अंती महानुभावांचे मनोगत आणि सन्मान हा कार्यक्रम पार पडला.पुढील वर्षी हा (२३ वा) जन्मोत्सव खडकवाडी (पारनेर) येथे संपन्न करण्याचा ठराव पारित होऊन सभा विसर्जित करण्यात आली.

या कार्यक्रमानंतर आमरसपुरीच्या गौतमप्रसादीचा संपूर्ण गावाने आस्वाद घेतला. त्याआधी सकाळीच ग्रामस्थांना उपमा, पोहे आणि मोहनथाळ असा नाश्ताही देण्यात आला होता.देवीभोयरे येथील भंडारी परिवाराने या संपूर्ण महोत्सवाचे चोख नियोजन केले होते.या महोत्सवासाठी समस्त पारनेर तालुका, चंदननगर (पुणे), आळेफाटा, शिरूर, अहमदनगर येथील जैन बंधूभगिनी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश क्षीरसागर यांनी आणि समारोप जैन समाजाचे पारनेर तालुका अध्यक्ष कुंदनलालजी साखला यांनी केला.शिवाजी जाधव, अध्यक्ष, अंबिका ट्रस्ट, सुभाष बेलोटे, पंचायत समिती सदस्य, नाथा गाजरे गुरुजी, ह.भ.प. विजय महाराज मुळे, पत्रकार आणि साहित्यिक नाना ढवळे हेही या कार्यक्रमात उपस्थित होते.

# सख्खे बहीण-भाऊ पोलीस उपनिरीक्षक झाल्याचा अभिमान

## सभापती काशिनाथ दाते यांचे प्रतिपादन



**पारनेर : प्रतिनिधी**

**सर्वसामान्य कुटुंबातील सख्खे बहिण -भाऊ यांची पोलिस उपनिरीक्षकपदी झालेली निवड ही अभिमानास्पद असल्याचे प्रतिपादन जि.प.चे माजी सभापती काशिनाथ दाते यांनी केले.**

हिवरे कोरडा येथील राहुल कोरडे यांची पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झाल्याबद्दल पारनेर ग्रामीण पतसंस्था परिवाराच्या वतीने कोरडेंचा सन्मान करण्यात आला. यावेळी सभापती काशिनाथ दाते बोलत होते. हिवरे कोरडाचे माजी चेअरमन कोंडीभाऊ कोरडे, एकनाथ पोटे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष थोरात, प्रा. संजय आहेर उपस्थित होते.

यावेळी बोलताना दाते म्हणाले की, ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील मुलगा ध्येय डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या अभ्यासात सातत्य ठेवून यश मिळवले त्याबद्दल राहुलचे कौतुक करावे तेवढे थोडेच. विशेष म्हणजे त्याची बहीण देखील २०१९ च्या झालेल्या स्पर्धा परीक्षेसाठी पोलीस उपनिरीक्षक पदी तिचीही निवड झाली. तिचीच प्रेरणा घेऊन राहुलने यश मिळवले. त्याचे आई-वडील चुलते-चुलती आणि विशेष म्हणजे आजोबा माजी चेअरमन कोंडीभाऊ कोरडे यांचे विशेष प्रोत्साहन या मुलांना होते याची प्रचिती मला देखील जेव्हा जेव्हा आमची भेट होईल तेव्हा त्यांच्या चर्चेतून जाणवले. एकाच कुटुंबातील सख्खे बहीण-भाऊ पोलीस उपनिरीक्षकपदी निवड होणे हा सुद्धा एक योगायोगच असल्याचे श्री.दाते म्हणाले.

### जिद्द ठेवल्यास यश मिळतेच

**आपले ध्येय जोपर्यंत निश्चित करत नाही, तोपर्यंत यशाकडे वाटचाल होत नाही. त्यासाठी आपण ध्येय निश्चित करावं. आपली अवस्था समुद्राच्या जहाजासारखी गोंधळलेली असते, त्यामुळे प्रयत्नात सातत्य ठेवा, प्रामाणिक प्रयत्न केल्यास यश मिळाल्याशिवाय राहणार नाही. महाराष्ट्र लोकसेवा आयोगात खूप परीक्षा आहेत ध्येय, चिकाटी, जिद्द ठेवल्यास यश मिळतेच**


**राहुल कोरडे**
पोलीस उपनिरीक्षक

# लोणीमावळ्यात येथील भैरवनाथाची यात्रेस सुरूवात

## धार्मिक कार्यक्रम व बैलगाडा शर्यतींचे आयोजन

**लोणीमावळा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील लोणीमावळा येथे सोमवार दि.२२ एप्रिल ते बुधवार दिनांक २४ एप्रिल रोजी पर्यंत भैरवनाथ यात्रा उत्साहाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती यात्रा कमिटीचे संयोजक तथा तंटामुक्तीचे उपाध्यक्ष बाळासाहेब शेंडकर यांनी दिली.**



लोणीमावळा येथील भैरवनाथ देवस्थान पंचक्रोशीत जागृत देवस्थान म्हणून ओळख आहे या प्रसंगी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे .सकाळी मांडव डहाळे लेक्षीम पथकाचा कार्यक्रम मुंबईकर मंडळीचे वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी शेरणी वाटप व मानाच्या काठीची मिरवणुक त्यानंतर मनोरंजनासाठी भिका भीमा यांचा लोकनाटयाचा तमाशा कार्यक्रम होणार आहे.

दुसऱ्या दिवशी हनुमान जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली.सायंकाळी कुस्तींचा जंगी आखाडा भरविण्यात येणार आहे. तर तिसऱ्या दिवशी बैलगाड्यांच्या भव्य शर्यतीचे आयोजन केलेले आहे. बैलगाड्यांच्या शर्यतीसाठी नवीनच घाटाचे काम करण्यात आलेले आहे त्यासाठी गावातील पडवळ, लाळगे, मावळे कुटुंबाने घाटासाठी आपली जागा दिली आहे.कुस्तीसाठी मोठमोठे मल्ल आपली हजेरी लावतात.यात्रा पार पाडण्यासाठी ग्रामस्थ ग्रामपंचायत, वि.का.सेवा सोसायटी, पाणी वाटप संस्था, मुबईकर ,पुणेकर , कला क्रीडा मंडळे ,प्रयत्न करीत आहे.जास्तीत जास्त भाविकांनी लाभ घेण्यात यावा असे आवाहन ग्रामस्थांचे वतीने सरपंच मंगलताई विलास शेंडकर यांनी केले.

# कुकडी डावा कालव्याला पाणी सोडण्याची मागणी

## पारनेर व श्रीगोंदा तालुक्यात पाण्याची टंचाई

**निघोज : प्रतिनिधी**

**पारनेर व श्रीगोंदा तालुक्यात कुकडी डावा कालव्याला पाणी सोडण्याची मागणी सातत्याने होत असून पाण्याच्या टंचाईने गोधन वाचविण्यासाठी हिरवा चारा मका कडवाळ, ऊस यासाठी तसेच पिण्याच्या पाण्याची आवश्यकता असल्याने आवर्तन सोडण्याची मागणी जनतेतून होत आहे.**



गेल्या अनेक वर्षांपासून या भागात कुकडीची तीन ते चार आवर्तने सुटायची. त्यानुसार शेतकऱ्यांनी शेतातील फळबागांचे लागवड केली होती. तालुयात मोठ्या प्रमाणात फळबागांची लागवड केली आहे. मात्र पाणी अभावी फळबागा जळू लागल्या आहेत. त्यामुळे शेतकरी हतबल झाले आहेत. शेतकर्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. मशागतीसाठी केलेला खर्च निघाला नसल्याने शेतकर्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. कुकडीचे पाणी वेळेत न आल्याने अनेक वर्षांपासून फळबागा जपलेल्या जळून चालल्या आहेत. तसेच शेतकर्यांचा ऊस करपून गेला आहे. तर पाण्याअभावी कलिंगड अर्ध्यावर सोडून द्यावे लागले असल्याचे चित्र दोन्ही तालुक्यात दिसत आहे. दरम्यान शेतकर्यांचे हाल होत असताना दुसरीकडे लोकप्रतिनिधींकडून काही उपाययोजना केल्या जात नसल्याने बळीराजा हतबल झाला आहे.

श्रीगोंदा व पारनेर तालुक्याला पूर्ण आवर्तन न मिळाल्यामुळे तालुक्यातील फळबागा जळून चालले आहेत. अनेक शेतकर्यांनी शेकडो एकरावर मोठ्या प्रमाणात फळबागांची लागवड केली आहे. पण सध्या दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने पाण्याची भीषण टंचाई भासत असून पाण्याअभावी तालुयातील फळबागा जळू लागल्या असून या बागा जगविणे शेतकर्यांसाठी मोठी आव्हान आहे. यावर्षी दमदार पाऊसच झाला नसल्याने विहिरींनी तळ गाठला आहे. परिसरातील ओढे, नाले, तलाव, कोरडे पडले असून पिण्याच्या पाण्यासाठी तालुक्यातील काही गावामध्ये ग्रामस्थांना टँकरची वाट पाहावी लागत आहे. शेतकर्यांना फळबागा जगवण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे.

मोठ्या कष्टाने लागवड केलेल्या बागेसाठी पाणी आणायचे कुठून असा प्रश्न शेतकर्यांना भेडसावत आहे. पण पाणी नसल्यामुळे पोटच्या मुलाप्रमाणे जपलेल्या बागा जळून जात असल्याचे विदारक चित्र तालुक्यायात दिसत आहे. सध्या पाच हजार लिटरच्या लहान टँकरसाठी २ ते ३ हजार रुपये शेतकर्यांना मोजावे लागत असून या पाण्यावर कशी तरी २००-३०० झाडे जगवत आहेत. सध्या तीव्र उन्हाळा जाणवत असून पाणी कमी पडत असल्याचे पाच ते सहा दिवसांनी पुन्हा पाणी द्यावे लागत असल्याने शेतकर्यांच्या खर्चात मोठी वाढ झाली आहे.फळबागा जगण्यासाठी पाणी विकत घेताना तारेवरची कसरत करावी लागत असल्याने बागा जगवणे अवघड झाले आहे.

### बंधारे भरण्यास अडचण

**सध्या सगळीकडे यात्रा जत्रांचा उस्तव मोठ्या प्रमाणात सुरु आहे. गावकरी कुलदेवतांच्या यात्रा प्रतिवर्षी परंपरेने भरवीत आहेत. राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीची यात्रा उत्सव सोमवार दि.२२ पासून सुरु झाला असून ही यात्रा दि.४ मे पर्यंत सुरू असते कुकडी डावा कालव्याला पाणी कमी सोडल्याने जलसिंचन बंधारे भरण्यास अडचण निर्माण झाली. मात्र कुकडी नदीला पाणी सोडण्याचा निर्णय घेतला असला तरी ते पाणी दि.२६ किंवा २७ पर्यंत कुकडी नदीद्वारे जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसरात पडेल अशी शक्यता आहे. पिण्यासाठी हे पाणी सोडण्यात येत असल्याने कुकडी डावा कालव्याला पाणी सोडल्यास जळणाऱ्या फळ बागा तसेच हिरव्या चाऱ्यासाठी उपयोग होऊ शकतो हे गृहीत धरून कुकडी डावा कालव्याला पाणी सोडल्यास श्रीगोंदा व पारनेर तालुक्यातील जनतेला लाभ मिळेल यासाठी कुकडी नदीला तसेच डावा कालव्याला जास्त क्षमतेने पाणी सोडण्याची मागणी जनतेतून होत आहे.**

# टाकळी ढोकेश्वर परिसरात बिबट्याचा धुमाकूळ; कुत्रा, वासरावर हल्ला

**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील जानई, निवडुंगवाडी, भोंद्रे पठार परिसरात बिबट्याने धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे ग्रामस्थ भयभीत झाले आहेत.**



शनिवारी (दि.२०) सायंकाळी जानई परिसरात सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक, पोपट बोरुडे यांच्या कुत्र्यावर बिबट्याने अंगणात रात्री सव्वासात वाजता हल्ला केला. तथापि, घरातील माणसांनी मोठमोठ्याने आरडाओरड केल्याने हा बिबट्या पळून गेला. त्यानंतर त्याच दिवशी पंधरा मिनिटातच शहाजी ठकाजी पायमोडे हे रानातून जनावरे घेऊन घरी येत असताना त्यांच्या घराजवळ एका त्यांच्या वासरावर बिबट्याने हल्ला केला व जखमी केले.

एकाच दिवशी या बिबट्याने कुत्रा व वासरू जखमी केले. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. सध्याला पाण्याचे साठे कमी झाल्यामुळे हे बिबटे वस्ती जवळ येऊन कुत्रे व इतर जनावर यांच्यावर हल्ले करू लागले आहेत. निवडुंगवाडी परिसरात अनेक दिवसांपासून बिबट्याचे वास्तव्य आहे. परिसरात वनक्षेत्र व दरी डोंगररांगा आहेत. त्यामुळे अनेक जंगली प्राण्यांचे वास्तव्य असते.

आतापर्यंत बिबट्याने माणसावर हल्ला केला नाही. सुरक्षितता म्हणून या परिसरात पिंजरा लावण्याची मागणी जनतेतून होत आहे. निवडुंगेवाडी, ढुसदरा, कासारे पठार, भोंद्रे पठार या परिसरात बिबट्याचे वास्तव्य कायम आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com